# करिअरसंबंधी योग्य मार्गदर्शन

प्रा. विजय दत्तात्रय नवले अधिव्याख्यात व प्रशिक्षक साबळे तंत्रनिकेतन पुणे यांचे 'डिप्लोमानंतर पुढे काय? आणि बरंच काही' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. प्रा. नवले यांचा डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांशी सतत संपर्क असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील शंकांचा व प्रश्नांचा अनेक पैलूंनी विचार करून त्या प्रश्नांची व शंकांची माहितीपूर्ण सोडवणूक प्रा. नवले यांनी या पुस्तकाद्वारे केली आहे.

डिप्लोमानंतर जे वेगवेगळे कोर्सेस करता येण्याजोगे आहेत त्यांची माहिती देताना लेखकाने या प्रत्येक कोर्सला लागणारा कालावधी, प्रवेश मिळविण्यासाठी लागणारी गुणवत्ता आणि मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांची त्या विषयाची मुळातील आवड यांचा मेळ कसा घालता येईल, याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. शिक्षणाकरीता बँकांकडून मिळणाऱ्या कर्जरकमेची आकडेबारीसुद्धा दिली आहे शिवाय जर डिप्लोमा परीक्षेत अपयश आले तर निरनिराळ्या शिक्षणक्षेत्रातील अनेक पर्यायांची उपलब्धता सांगितली आहे. या सर्वांबरोबरच महत्त्वाचा भाग म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती, न्यूनगंड घालवण्याकरीता लेखकाने अनेक प्रकारे समजावले आहे. त्याचा आत्मविश्वास वाढेल याकरीता अनेक गोष्टी साध्या साध्या पद्धतीने कशा उपयोगात आणाव्या हेही सांगितले आहे. अर्ज (नोकरीकरीता) कसे करावे, इंटरव्ह्यूची तयारी कशी करावी याबद्दल अनेक उपयुक्त सूचना दिल्या आहेत. विद्यार्थी इंग्लिशच्या लिखित पेपरची तयारी करतात पण बोलताना कमी पडतात त्याकरीता रोजचे इंग्लिश वर्तमानपत्र वाचणे व डिक्शनरीचा उपयोग करून शब्दभांडार वाढवावे, हेही लेखकाने आवर्जून सांगितले आहे. या पुस्तकातील अनेक तांत्रिक विषयांच्या अभ्यासक्रमाची माहिती अनेक पालकांनाही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक निवडीकरता उपयुक्त आहे.

'डिप्लोमानंतर पुढे काय? आणि बरंच काही'
लेखक : प्रा. विजय नवले
प्रकाशक : महेश सुदाम नारके, पुणे.
एम-पॉवर सेंटर फॉर ह्यूमन एक्सलन्स.
पृष्ठे : ११५,
मूल्य : ६० रुपये

–मधुमालती कोटीभास्कर

३० एप्रिल ०६ पुढारी



"डिप्लोमानंतर पुढे काय ? आणि बरंच काही...."